नि.फौ.प्र.क्र.१६/२०२४
सरकार -वि.- जगन नारखेडे+१३
**निशाणी क्र.४०६**

**<u>सरकारतर्फे साक्षीदार क्रमांक २४ याची जबानी</u>**

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

नांव - गणेश एकनाथ डहाके,

वय - ४१ वर्षे, व्यवसाय – शेती,

रा. - निमखेड, ता. मलकापुर जि. बुलढाणा.

**<u>सरतपास- सरकारी अभियोक्ता श्री.आर.बी. देवराज यांचेमार्फत शपथेवर सुरु....</u>**

०१. माझी शेती भाडगणी येथे चार एकर आहे. मी जगन नारखेडेच्या केसमध्ये साक्ष देण्याकरिता आलो. माझ्याकडे विनोद राणे आला होता. जगन नारखेडे हा भालेगावला कापूस देत आहे, तुमचाही कापूस द्या असे त्याने मला सांगितले. त्यावरून मी माझा १५ क्वींटल ७७ किलो कापूस दिला. तो कापूस मी ९ हजार रूपये भावाने दिला. त्यानंतर मला इंगळेचा फोन आला. त्याने त्याचाही कापूस मला द्यायला सांगितला. त्यानेही माझा कापूस जगन नारखेडेला देण्यास सांगितला. तो कापूस मी जगन नारखेडेला दिला. तोही कापूस मी ९ हजार भावाने दिला. त्यानंतर तळणीचे सुभाष कठडे, पिंटु इंगळे, प्रदिप नाफडे, शामा गाडे, मोहन इंगळे यांनी देखील कापूस जगन नारखेडेला दिला. त्यांनी तो कापूस १९७ क्वींटल दिला. विनोद राणेने मला सांगितले की, एका महिन्यानंतर पैसे मिळतील. त्याने मला नारायण व-हाडे पैसे आणून देतील असेही सांगितले. तो कापूस विनोद राणे व नारायण व-हाडे याने नेला. दिलेल्या कापसाचे पैसे मला मिळाले नाही. मला फक्त २० हजार रूपये मिळाले व शामा गाडे याला १० हजार रूपये मिळाले. इतरांना पैसे मिळाले नाही. पोलीसांनी माझ्याकडे विचारपूस केली होती. मी जगन नारखेडे व नारायण व-हाडे या दोघांनाही ओळखतो. जगन नारखेडे हा दृकश्राव्य पध्दतीने हजर आहे व नारायण व-हाडे आज न्यायालयात प्रत्यक्षात हजर आहे.

सरतपास पुर्ण.

**<u>उलटतपास- आरोपी क्र.१,४,११ व १२ तर्फे विधीज्ञ श्री.आर.एस.जगताप यांचेमार्फत सुरु.</u>**

०२. मी १५ क्वींटल ७७ किलो कापूस झाल्याबाबत कोणतेही कागदपत्र दाखल केले नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझा प्रत्यक्षात जगन नारखेडेशी कोणताही व्यवहार झाला

नाही. मी पैसे बाकी असल्याबाबत माझ्या वकीलांमार्फत जगन नारखेडेला नोटीस वगैरे दिली नव्हती तसेच मी त्याच्याविरुध्द कोणतीही फौजदारी अथवा दिवाणी कार्यवाही केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, कापूस देण्याबाबत मला वेगळे कमीशन भेटत होते. हे म्हणणे खरे आहे की, विनोद राणे हा माझा नातेवाईक आहे. हे म्हणणे खरे नाही की, विनोद राणेला वाचविण्याकरिता आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास काही नाही.

**<u>उलटतपास- आरोपी क्र.२ व ३ तर्फे विधीज्ञ श्री.तांदुळकर यांचेमार्फत सुरु....</u>**

०३. आरोपी क्र.१,४,११ व १२ तर्फे घेण्यात आलेला उलटतपासत स्वीकृत करण्यात आला.

**<u>उलटतपास- आरोपी क्र.५ तर्फे विधीज्ञ श्री. ए.सी. एदलाबादकर यांचेमार्फत सुरु....</u>**

०४. आरोपी क्र.१,४,११ व १२ तर्फे घेण्यात आलेला उलटतपासत स्वीकृत करण्यात आला.

**<u>उलटतपास- आरोपी क्र.६,७, ९ व १४ तर्फे विधीज्ञ श्री.जी.डी.पाटील यांचे मार्फत सुरु....</u>**

०५. हे म्हणणे खरे आहे की, विनोद राणे हा माझा साळा आहे. मी पोलीसांना जबाब देतेवेळी माझ्याकडे भाडगणी शिवारात चार एकर शेती आहे हे दाखविणारा कागदोपत्री पुरावा मी पोलीसांना दिला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, मी विनोद राणे मार्फत कापूस पेरला त्यातून मला उत्पन्न झाले, तो कापूस मी विनोद राणे मार्फत जगन नारखेडेला दिला व तो कापूस विनोद राणे व नारायण व-हाडे यांनी नेला हे दर्शवणारा माझ्याकडे कोणताही कागदोपत्री पुरावा उपलब्ध नाही. हे म्हणणे खरे आहे की, तो कापूस कोणत्या दिवशी, कोणत्या गाडीने व कोणत्या तारखेला नेला हे मी सांगू शकत नाही. साक्षीदार परत स्वतःहून सांगतो की, तो कापूस २३ तारखेला नेला. हे म्हणणे खरे नाही की, मी कोणताही कापूस पेरला नाही, तसा कोणताही कापूस दिला नाही, केवळ पैसे उकळण्याच्या बहाण्याने आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास काही नाही.

**<u>उलटतपास- आरोपी क्र.८ तर्फे विधीज्ञ श्री.एन.एस.तायडे यांचेमार्फत सुरु....</u>**

०६.  आरोपी क्र.१,४,११,१२,६,७,९ व १४ तर्फे घेण्यात आलेला उलटतपासत स्वीकृत करण्यात आला.

**<u>उलटतपास- आरोपी क्र.१० तर्फे विधीज्ञ श्री.एस.एस.मोरे यांचेमार्फत सुरु....</u>**

०७.  आरोपी क्र.१,४,११,१२,६,७,९ व १४ तर्फे घेण्यात आलेला उलटतपासत स्वीकृत करण्यात आला.

**<u>उलटतपास- आरोपी क्र.१३ तर्फे विधीज्ञ श्री.बी.एस.वानखेडे यांचेमार्फत सुरु....</u>**

०८.  आरोपी क्र.१,४,११,१२,६,७,९ व १४ तर्फे घेण्यात आलेला उलटतपासत स्वीकृत करण्यात आला.

फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

Digitally signed by PARAG SATISH THAKARE
Date: 2026.05.13 15:56:42 +0530

दिनांक : १३/०५/२०२६.

**( पी.एस.ठाकरे )**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(न्यायालय क्र.१), मलकापूर